# बिनतारी संदेश

प्रति :- सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा(.)
राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम(.)

प्रत माहितीस :- अपर पोलीस अधीक्षक, वाशिम(.) यांना हस्ते(.)
पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम(.) यांना हस्ते(.)
संगणक प्रमुख पो.अ.,कार्यालय, वाशिम(.)यांना हस्ते(.)
डिपीजी लिपीक पो.अ.,कार्यालय, वाशिम(.)यांना हस्ते(.)

पासुन :- पोलीस अधीक्षक, वाशिम(.)

---

क्रमांक:पोअवा/आस्था/सर्व सा.बदल्या/3469 /२०१७, वाशिम. दिनांक :- 8 MAY 2017

---

= आपणास याद्वारे कळविण्यात येते की, या महिन्यात पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची बदल्या करण्यात येणार आहे(.) आमच्या असे निदर्शनास आले आहे की काही पोलीस अधिकारी / कर्मचारी हे बदली करीता कार्यालयात येवून संबंधित लिपीका सोबत भेटतात तसेच ईतर मान्यवराकडून बदलीबाबत पत्र किंवा फोन आणत असता हि बाब पोलीस खात्यात न शोभणारी असुन पोलीस शिस्तीला धरुन नाही(.) पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे **विनंती नुसार बदली मिळणे हा त्यांचा हक्क नाही** रिक्त पदे विनंतीचे स्वरुप विचारात घेवुन पोलीस आस्थापना मंडळानुसार बदली बाबतचे विनंती अर्ज निश्चीतपणे विचारात घेण्यात येतील या मध्ये कोणत्याही पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी अर्जाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडुन संदर्भ / विनंती करु नये व भेटू नये तसेच बदली संबंधीबाबत विनंती अन्य कोणाही मार्फत पाठवु नये(.) पाठविल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही(.) तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांनी बदलीबाबत कोणत्याही लिपीक तसेच अधिकारी यांना भेटणार नाही(.) तसेच बदली संबंधी कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांनी बदलीबाबत कोणत्याही अधिकारी किंवा लिपीक यांना भेटलो होतो काम झाले नाही अशा प्रकारचे कोणत्याही प्रकारची तक्रार आमच्याकडे प्राप्त झाल्यास संबंधीतावर योग्यती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी(.) करीता आपले अधिनस्त असलेले सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सदरची सुचना देवून सदरची सूचना नोटीस बोर्डवर लावून ३ दिवसापर्यंत सकाळ / संध्याकाळचे गणनेचेवेळेत देण्यात येवून तशी नोंद स्टे.,डा. मध्ये घ्यावी(.)

---

**( मोक्षदा पाटील )**
पोलीस अधीक्षक, वाशिम

Transfer-2017 GT-shukla